# डाळिंबाचे नवीन बायोफोर्टीफाइड वाण 'सोलापूर लाल'

**डॉ दिनेश बाबू, डॉ नृपेंद्र व्ही सिंह आणि डॉ आशिस माईति,डॉ ज्योत्सना शर्मा**

भा.कृ.सं.प.-राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र,सोलापूर

डाळिंबाचे नवीन आशाजनक संकरित 'सोलापूर लाल' [भगवा x [(गणेश x नाना) **x** दारू] हे जैव-विविधता संवर्धित वाण आहे. हे सोलापुरातील भा.कृ.सं.प.-रा.डा.सं.के.येथे 2017 मध्ये विकसित करण्यात आले.हया फळामध्ये मोठया प्रमाणात लोह, जस्त, व्हिटॅमिन-सी आणि अँथोसायनिन आहे. मानवी पौष्टिकतेच्या कमतरतेचा सामना करण्यासाठी हे वरदान आहे. हे एक उच्च उत्पादक आणि लवकर परिपक्व होणारं वाण आहे. पौष्टिकदृष्ट्या अप्रतिम असण्याव्यतिरिक्त,पक्वतेत या वाणाचा टीएसएस 17 डीग्री ब्रीक्स च्या वर आहे, जो एक आशाजनक प्रक्रिया युक्त वाण म्हणून अतिरिक्त लाभ देते. 17 डीग्री ब्रीक्स च्या वर टी एस एस सह पौष्टिकदृष्ट्या समृद्ध असल्याने, निर्यातीलाही मागणी असणे अपेक्षित आहे. असेही आढळून आले आहे की २०२० मध्ये सततच्या पावसाळ्याच्या दिवसातही सोलापूर लाल वाणाच्या झाडावरील फूल गळ कमी होती आणि चांगली फळधारणा झाली होती. भगवा प्रमाणेच,सोलापूर लाल हे एक नवीन वाण देखील तेलकट डाग रोगाला बळी पडते.

'सोलापूर लाल' मधील अत्यंत महत्त्वाची वैशिष्टे खाली दिली आहेत.

| **सोलापूर लाल डाळिंबाची वैशिष्ट्ये** | |
|---|---|
| **वैशिष्ट्ये** | **सोलापूर लाल** |
| झाडाची उंची (मी) | 2.0-2.3* |
| फळ परिपक्वता (दिवस) | 160-165* |
| फळांचे वजन (ग्रॅम) | 260-270g |
| फळांची संख्या (संख्या / झाड) | भागवापेक्षा अधिक अनावश्यक फळे काढल्यावर 130-140* |
| सहाव्या वर्षी उत्पन्न (टन / हेक्टर) | 26-27* |
| फळांचा रंग | पुर्णपणे लाल* |
| सालीची जाडी (मिमी) | मध्यम (3.3-3.5) |

| | |
|---|---|
| दाणे | टपोरे आणि गडद लाल* |
| बियांचा पोत | मध्यम** |
| टीएसएस (डिग्री ब्रिक्स) | 17 पेक्षा अधिक* |
| व्हिटॅमिन-सी, अँथोसायनिन, जस्त, लोह | भगवा वाणापेक्षा अधिक |
| जिवाणू जन्य रोग (तेलकट डाग) आणि इतर रोगांना संवेदनशीलता | भगवा प्रमाणेच |
| टिप :- <br>• कंसात एक तारा (*)चिन्हांकित केलेली अक्षरे भगवापेक्षा वरिष्ठ आणि दुहेरी तारा (**)चिन्हांकित अक्षरे भगवापेक्षा निकृष्ट आहेत. <br>• वरील वैशिष्टे 6 वर्षापेक्षा जास्त वयाच्या शारीरिकदृष्ट्या परिपक्व झाडांवर आधारित आहेत, सोलापुरात पावसाळ्याच्या हंगामातील पिकाच्या परिस्थितीनुसार वेगवेगळ्या ठिकाणी, हवामान परिस्थिती, पीक हंगाम आणि व्यवस्थापन पद्धतींमध्ये बदल होवू शकतात. | |

नुकतीच नव्याने प्रसिद्ध केलेले वाण आणि सोलापूरच्या परिस्थितीत त्याचे मूल्यांकन केल्यामुळे सल्ला देण्यात येतो की वेगवेगळ्या कृषी क्षेत्रामध्ये, शेतकऱ्यांच्या शेतातील परिस्थितीत, प्रत्यक्ष कामगिरीचे आकलन करण्यासाठी सुरुवातीला कमी क्षेत्रात लागवड करणे योग्य राहील.
पुढे हे देखील लक्षात घेतले जाऊ शकते की निरोगी रोपे वाटप करण्यापूर्वी त्यांनी 'सोलापूर लाल' साठी राज्य शासनाकडून प्रथम नर्सरी प्रमाणपत्र घ्यावे या अटीवर,आम्ही केवळ 3 वर्षांच्या मर्यादित कालावधीचे परवाने खालील शेतकऱ्यांना दिले आहेत.
मे. एचयू गुगळे बायोटेक, जामखेड, जि. अहमदनगर, मे. मोहिते फार्म काटी, इंदापूर जि.पुणे, कृषि विज्ञान केंद्र बारामती जि.पुणे , श्री.सकाराम खातोडे,गाणोरा ता.अकोले, जि.अहमदनगर,मे. बावके पाटील नर्सरी,साकुरे,ता.राहाता जि.अहमदनगर, मे. स्मार्ट क्रॉप नर्सरी जि औरंगाबाद. तर, सर्व शेतकऱ्यांना विनंती आहे की रोपे खरेदी करण्यापूर्वी संबंधित फर्मकडे

'सोलापूर लाल' करिता राज्य शासनाने दिलेले वैध नर्सरी प्रमाणपत्र असल्याची खात्री करून घ्यावी. पीपीव्ही व एफआरए, नवी दिल्ली अंतर्गत विविध प्रकारच्या अस्थायी संरक्षणाखाली असल्याने या वनस्पतींच्या विक्रीस इतर कोणत्याही स्रोतास परवानगी नाही. नर्सरी परवाना नसलेल्या फर्मकडून रोपे खरेदी करून लागवड केल्यास आयसीएआर-एनआरसीपी जबाबदार राहणार नाही, यासाठी शेतकऱ्यांना जागरुक राहण्याची विनंती केली जात आहे.



आयसीएआर-एनआरसीपी, सोलापूर येथे मदर प्लांट



फळ तोडणीच्या 2 महिन्यांपूर्वी शेतकऱ्याच्या बागेत





**शेतकऱ्याच्या शेतातील फळधारणा**



फळ पक्वतेत गडद लाल



पक्वतेत गडद लाल दाणे

**बायोफोर्टीफाइड डाळिंबाचे वाण 'सोलापूर लाल'**